MO.9860898564
अन्याय, अत्याचार, भ्रष्टाचाराचा कर्दनकाळ
सायं.दैनिक महाराष्ट्र
# आरंभ
संपादक - दिपक थोरात



आष्टी तालुक्यातील पिंपरी घाटा या गावातून महाराष्ट्र राज्यस्त क्रमांक २२२ जातो त्या चौकात मोठा खड्डा पडल्याने आठ दिवसात छोटे-मोठे अपघात झालेले आहेत या खड्ड्यामुळे एखाद्यांचा जीव जाऊ शकतो कितेक जणांचे जीव गेल्यावर हा बुजवणार संबंधित विभागाचे अधिकारी याकडे लक्ष देत नाहीत किती लोकांचे जिव गेल्यावर हा खड्डा बुजवणार असा प्रश्न आता ग्रामस्थांकडून उपस्थित केला जात आहे
छायाचित्र सुरेश कांबळे

बीड (महाराष्ट्र) | सायं.दैनिक | मराठी | वर्ष -०२ | अंक -३६ | बुधवार दि.२३ ऑक्टोबर २०२४ | आरएनआय -एमएएचएमएआर/२०२३/८३९६५ | किंमत ३ रू | । पाने ४
Beed (Maharashtra) | Daily Evening | MARATHI | Year-02 | Issue -36 | WEDNESAY DT.23 OCTOBER 2024 | RNI : MAHMAR/2023/83965 | PRICE - 3 RUPEES | PAGES - 4

# थोरल्या पवाराच्या आशीर्वादासाठी राजेंद्र मस्के वर संदीपची भाकरी फिरवण्याची नामुष्की

## ज्योतीताई मेटे राजेंद्र मस्के यांची कसोटी पक्ष की समाज?

- मराठा वर्सेस ओबीसी वादामध्ये आता ज्योती मेटे राजेंद्र मस्के यांची भूमिका काय असणार समाजाकडून ज्योती मेटे राजेंद्र मस्केना प्रश्न?
- आमदार प्रकाश सोळंके ने पुतण्या जयसिंह सोळंकेला चॉकलेट दिल्याची माजलगाव मतदार संघात चर्चा?
- जिल्ह्यातील मराठा ओबीसीचा राजकारण जास्त प्रमाणात पेटलं मराठ्यांच्या नेत्यांना आता ओबीसीच्या उमेदवारांना निवडून आणण्याची आवाहन?
- पवारांची खेळी बीड जिल्ह्याला या अगोदरच माहिती आहे एक निष्ठेचे फळ म्हणून संदीप क्षीरसागर च्या पाठीशी उभा शरद पवार

















**प्रतिनिधी । बीड**

**बीड जिल्ह्यामध्ये शरद पवार कोणत्या ठिकाणी कोण उमेदवार देणार याबद्दल बवचागलीचउत्सुकता लागली होती. त्यात आता बीडमध्येकोण उमेदवार असणार याबाबत अनेक तरतर्कवितरक काढले जात होते. मात्र अखेर आज शरद पवारांच्या राष्ट्रवादीमध्ये आमदार संदीप क्षीरसागर यांनाच संधी देण्याचे निश्चित झाले. महाविकास आघाडीची अधिकृत यादी आता लवकरच बाहेर येणार आहे. मात्र बीडमधून आमदार संदीप क्षीरसागर आणि केज या राखीव मतदार संघातून माजी आमदार पृथ्वीराज साठे या दोघांच्या नावांची निश्चिती शरद पवार यांनी केली आहे.**

महाराष्ट्र मध्ये विधानसभेच्या निवडणुका लागल्या असून आता नामनिर्देश पत्र भरण्यासही सुरुवात झाली आहे. येत्या २० नोव्हेंबर रोजी मतदान होणार असून २३ नोव्हेंबरला मतमोजणी मतमोजणी होणार आहे. राज्यामध्ये महाविकास आघाडी विरुद्ध महायुती यांच्यामध्ये सरळ लढती होत आहेत. महायुती मधील प्रमुख पक्ष असलेल्या भाजपने त्यांच्या ९९ उमेदवारांची यादी दोन दिवसांपूर्वीच जाहीर केली आहे. त्यानंतर एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेनेही उमेदवारी जाहीर केले असून, अजित पवार यांनी तर थेट एबी फॉर्मच उमेदवारांना दिले आहेत. महायुतीकडून उमेदवारांची घोषणा झाली असतानाच महाविकास आघाडी कडून मात्र उमेदवारांची घोषणा करायला उशीर होत आहे. या पार्श्वभूमीवर महाविकास आघाडीची उमेदवारांची घोषणा कधी होणार याकडे लक्ष लागले आहे.

केज मतदार संघातून पृथ्वीराज साठे यांना शरद पवारांनी उमेदवारी देऊन एक निष्ठेचं फळ.

केज-अंबाजोगाई मधून साठेंना उमेदवारी माजी आमदार साठे यांच्याकडून आभार...

उमेदवारीची निश्चिती झाल्याचे समजतात माजी आमदार पृथ्वीराज साठे यांनी फेसबुकला पोस्ट करीत पक्षाचे अध्यक्ष शरद पवार, प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील, पक्षाचे नेते आमदार रोहित पवार, खासदार बजरंग सोनवणे आणि इतर सगळ्या नेत्यांची आभार मानले आहेत. या सगळ्या नेत्यांनी माझ्यावर विश्वास टाकला असून तो सार्थ करू असा विश्वास मा. आ. पृथ्वीराज साठे व्यक्त केला आहे.

माजलगाव मतदार संघामध्ये पुन्हा एकदा अजित पवारांच्या राष्ट्रवादीने माजी मंत्री आमदार प्रकाश सोळुंखे यांना उमेदवारी दिलेली आहे प्रकाश सोळंके यांची पुतणे जयश्री सोळंके यांचे नाव चर्चेत असताना आता काकाने पुन्हा एकदा पुतण्याला चॉकलेट दिल्याची चर्चा माजलगाव मतदार संघामध्ये ऐकायला मिळत आहे काही दिवसापूर्वी प्रकाश सोळंके यांनी राजकीय वारसदार म्हणून जय सिंह सोळंके यांची माजलगाव विधानसभेमध्ये घोषणा केली होती परंतु त्या ठिकाणी पुतण्याला आता पुन्हा एकदा दादांनी चॉकलेट दिल्यामुळे दुरावा निर्माण होण्याची दाट शक्यता आहे.

बीड लोकसभेमध्ये २०२४ ला स्वर्गीय गोपीनाथरावजी मुंडे साहेब यांची कन्या असलेल्या पंकजा मुंडेंना राजेंद्र मस्के ने धोका दिल्याचे चित्र स्पष्ट झाल्यानंतर आता राजेंद्र मस्के यांनी पुन्हा एकदा ज्योती मिळते यांच्या माध्यमातून शरद पवारांची राष्ट्रवादी गाठली आहे का असा सवाल यावेळी मराठा ओबीसी बांधव करत आहेत जे स्वर्गीय विनायक रावजी मेटे साहेब यांचे झाले नाही ते स्वर्गीय गोपीनाथ मुंडे साहेब यांचे झाले नाहीत जे पंकजा मुंडे यांचे झाले नाहीत ते राजेंद्र मस्के आता संदीप क्षीरसागर यांचे होऊ शकतात का असा सवाल या ठिकाणी आता बीड विधानसभेतील जनता करू लागली आहे त्यामुळे राजेंद्र मस्के असतील किंवा ज्योतीताई नेते असतील यांना आता मराठा समाजातील तळागाळातील लोकांपर्यंत जात असताना नेते मस्के यांची कसोटी की पक्ष समाज ओबीसी मराठा वादात पुन्हा एकदा ओबीसी उमेदवाराला निवडून देण्याची आवाहन यांच्यासमोर आहे

# भिमशक्तीने केल्या नुतन पदाधिकाऱ्यांच्या निवडी

## तालुकाध्यक्षपदी सुनिल गायसमुद्रे, महासचिवपदी निखिल सिरसट, शहराध्यक्षपदी उमाकांत सिरसट आणि उपाध्यक्षपदी धिरज गायसमुद्रे

**प्रतिनिधी । अंबाजोगाई**

बहुजनांच्या न्याय हक्कांसाठी धर्मनिरपेक्षपणे लढणारी संघटना म्हणून भिमशक्तीची सर्वदूर ओळख आहे. भिमशक्तीचे संस्थापक अध्यक्ष खासदार तथा महाराष्ट्र राज्याचे माजी सामाजिक न्याय मंत्री चंद्रकांत हंडोरे यांच्या नेतृत्वाखाली भिमशक्तीचे बीड जिल्हा कार्याध्यक्ष भिमराव सरवदे व

डॉ अमरेंद्र विद्यागर तसेच हेमंत राष्ट्रपाल जी यांनी भिमशक्तीच्या धारूर तालुक्यातील पदाधिकाऱ्यांना रितसर नियुक्तीपत्र देवून निवडी जाहीर केल्या यात धारूर तालुकाध्यक्षपदी सुनिल गायसमुद्रे, महासचिवपदी निखिल सिरसट, शहराध्यक्षपदी उमाकांत सिरसट आणि उपाध्यक्षपदी धिरज गायसमुद्रे यांची नियुक्ती केली आहे. नवनिर्वाचित पदाधिकाऱ्यांच्या निवडीचे सर्वस्तरांतून स्वागत होत आहे.

धारूर येथील आंबेडकरी चळवळीतील तरूण कार्यकर्ते आणि सामाजिक व दलित चळवळी मध्ये कार्यरत आहेत. तसेच चळवळी मध्ये चांगले योगदान देणाऱ्या व बांधिलकी जोपासत गोरगरीब, गरजू लोकांचे प्रश्न सोडविण्यासाठी असणाऱ्या युवकांच्या सामाजिक कार्याची दखल घेऊन खासदार तथा राज्याचे माजी सामाजिक न्याय मंत्री चंद्रकांत हंडोरे यांच्या नेतृत्वाखाली व भिमशक्ती सामाजिक संघटनेचे संस्थापक महासचिव मोहनराव माने, मुंबई प्रदेशाध्यक्ष शशिकांत बनसोडे भिमशक्ती मराठवाडा अध्यक्ष संतोष जी भिंगारे बीड जिल्हा अध्यक्ष डॉ अमरेंद्र विद्यागर धीमंत राष्ट्रपाल जी यांच्या मार्गदर्शनाखाली भिमशक्तीचे बीड जिल्हा कार्याध्यक्षपदी भिमराव सरवदे यांनी रितसर नियुक्तीपत्र देवून भिमशक्तीच्या धारूर तालुक्यातील पदाधिकाऱ्यांच्या निवडी जाहीर केल्या यात धारूर तालुकाध्यक्षपदी सुनिल गायसमुद्रे, महासचिवपदी निखिल सिरसट, शहराध्यक्षपदी उमाकांत सिरसट आणि उपाध्यक्षपदी धिरज गायसमुद्रे यांची नियुक्ती केली आहे. भिमशक्तीच्या धारूर तालुक्यातील नवनिर्वाचित पदाधिकाऱ्यांच्या निवडीचे बीड जिल्ह्यांतून स्वागत होत आहे. यावेळी प्रशांत वाघमारे, राकेश सिरसट, निखिल गायसमुद्रे, रजनीकांत सिरसट, सचिन वाघमारे, अक्षय वैरागे, बादल सिरसट, बबलू गायसमुद्रे, डोंगरे सर, जिजा सिरसट, अभिजीत गायसमुद्रे,



कपिल सिरसट, करण सिरसट, गणेश सिरसट यांच्यासह भिमशक्तीचे प्रमुख पदाधिकारी व असंख्य कार्यकर्ते उपस्थित होते.

भिमशक्तीच्या माध्यमातून तरूणांना संधी देणार :खासदार तथा राज्याचे माजी सामाजिक न्याय मंत्री चंद्रकांत हंडोरे यांनी बीड जिल्हा कार्याध्यक्षपदी माझी नियुक्ती करून मोठी जबाबदारी सोपविल्यानंतर मी मागील काही महिन्यांपासून संघटना विस्तारासाठी सातत्याने प्रयत्न करीत आहे. बीड जिल्ह्यात भिमशक्तीची संघटनात्मक बांधणी केली. नवनविन कार्यकर्ते, युवक आणि तरूणांना संघटनेशी जोडण्याचे काम करीत आहोत, त्याचाच एक भाग म्हणून धारूर तालुक्यातील युवकांना विविध पदांवर नियुक्त्या दिल्या आहेत. भविष्यात ही भिमशक्तीची संघटनात्मक बांधणी प्रभावीपणे करून, संघटनेच्या सर्व आजी - माजी पदाधिकाऱ्यांना सोबत घेऊन भिमशक्तीच्या माध्यमातून चळवळीला बळ व हंडोरे साहेबांना ताकद व युवकांना संधी देण्यासाठी कटिबद्ध आहोत.- भिमराव सरवदे (भिमशक्ती, जिल्हा कार्याध्यक्ष, बीड.)



दिनांक २३ ऑक्टोबर २०२४ रोजी महाराष्ट्राचे मुख्यमंत्री कामाख्या मंदिर, गुहावटी येथे देवी दर्शनासाठी गेले असता बाजीराव चव्हाण, युवा सेना मराठवाडा निरीक्षक यांची साहेबांच्या समवेत टिपलेली छबी . निवडणुकीच्या पूर्वसंध्येला मां कामाख्या देवीचे दर्शन बाजीराव चव्हाण यांना त्यांचे कायम प्रेरणास्रोत राहिलेले मा. मुख्यमंत्री एकनाथजी शिंदे साहेब यांच्या सहवासात घेण्याचा योग आला. उज्वल भविष्याकडील यशस्वी वाटचालीचे हे जणू संकेत आहेत.

## काढणीस आलेला कांदा पाण्यावर तरंगु लागला

# कालच्या पावसाने शेतकऱ्यांच्या पिकांचे नुकसान ; स्थळ पंचनामा करून नुकसान भरपाईची मागणी:- डॉ.गणेश ढवळे

**प्रतिनिधी ।** बीड

काल दिवसभर झालेल्या मुसळधार पावसामुळे लिंबागणेश परीसरातील शेतकऱ्यांच्या कांदा पिकांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले असुन काढणीस आलेला कांदा पाण्यावर तरंगताना पाहुन शेतकरी हवालदिल झाला आहे. सामाजिक कार्यकर्ते डॉ.गणेश ढवळे यांनी तहसीलदार नरेंद्र कुलकर्णी,मंडळ अधिकारी अशोक डरपे,तलाठी नेवडे, जिल्हा कृषी अधीक्षक कृषी अधिकारी बाबासाहेब जेजुरकर यांच्या बदलीनंतर अतिरिक्त पदभार स्वीकारलेले साळवे, कृषी सहाय्यक रामेश्वर पेजगुडे, कृषी पर्यवेक्षक राजेंद्र राऊत यांच्याशी फोनवरून संवाद साधत नुकसानीचे व्हिडिओ आणि फोटो पाठवुन तातडीने पिकांचे पंचनामे करून नुकसान भरपाई देण्याची मागणी केली आहे.

गट नंबर २२१शेतामध्ये अडीच एकर कांद्याची लागवड केलेली असुन एक एकर काढणीस आलेला कांदा कालच्या मुसळधार पावसामुळे पाण्यावर तरंगत असुन जमेल तसा गोळा करत आहोत. नगर, सोलापूर याठिकाणी कांदा विक्रीसाठी पाठवायचो.परंतु काढणीवर आलेला कांदा पावसामुळे खराब झाल्याने वजनात घट येणे, कांद्याचे आवरण सडणे रात्रभर पावसात कांदा कुजल्याने कांद्याला बाजारात भाव मिळत नाही त्यामुळे संपूर्ण कांदा पिक वाया गेले असुन शासनाने




पंचनामा करून नुकसान भरपाई द्यावी अशी मागणी पिडीत शेतकरी आश्रुबा प्रभु कोळपे यांनी केली आहे.

शेतकऱ्यांना क्रॉप इन्शुरन्स अप माध्यमातून झालेल्या नुकसानीची माहिती स्वत: भरायची याद्वारे माहिती भरल्यानंतर अधिकारी आणि कर्मचारी हे पंचनाम्यासाठी शेतकऱ्यांच्या बांधावर येणार आहेत आता ग्रामीण भागातील बहुतांश अडाणी शेतकऱ्यांना याप्रकारे तक्रार नोंदवता येत नसल्याने फोन वरून माझ्याशी संपर्क करतात आणि त्यानंतर मी महसूल आणि कृषी विभागाच्या अधिकारी व कर्मचाऱ्यांना माहिती कळवतो. त्यानंतर पंचनाम्यासाठी अधिकारी आणि कर्मचारी येतात.

## केज मधुन पप्पुजी कागदे यांना डावल्यामुळे बीड जिल्ह्यात महायुतीला एकही मत होणार नाही - महेश आठवले

**प्रतिनिधी ।** बीड

केज मतदार संघामधून पप्पू जी कागदे यांना डावल्यामुळे अब महायुतीला बीड जिल्ह्यामध्ये दलीत समाजाचे एकही मत मिळू देणार नाही गेल्या काही दिवसात पासुन पप्पुजी कागदे यांनी केज मतदान संघात उमेदवारीची मागणी केली होती व नेते नामदार रामदास आठवले यांनी बीड मधील सभेत ही उमेदवारी जाहिर केली होती व आज ज्या केज मतदान संघात पप्पुजी कागदे साहेब यांना मुदाम महायुतीच्या लोकांना डावलेले त्यामुळे दलीत समाजात शब्दात महायुतीबदल तीव्र प्रतिक्रिया युवक जिल्हा अध्यक्ष महेश आठवले दिली आल्या आहेत बीड जिल्ह्यात ठझख चे सर्व कार्यकर्ते नाराज झालेले आहेत त्यामुळे बीड जिल्हात जिथे कुटे महायुतीचे उमेदवार असतील तिथे ठझख महायुतीचे कोणतेही



काम करणार नाही व महायुतीला एकही मत दलीत समाज करणार नाही सर्व कार्यकर्ते काम करणार आहे येणार्या काळात ठझख ची ताकद दाखवुन दिल्याशिवाय राहणार नाहीत आसे ठझख चे युवा जिल्हा अध्यक्ष महेश आठवले यांनी म्हणले आहे

## आष्टी मधून भाजपने सुरेश धस यांना उमेदवारी द्यावी - सरपंच अंकुश शेळके

**प्रतिनिधी ।** शिरूर कासार

आष्टी पाटोदा शिरूर हा मतदारसंघ भारतीय जनता पार्टीचा असून तो भारतीय जनता पार्टीच्या बालेकिल्ला राहावा म्हणून माजी आमदार सुरेश धस यांनाच उमेदवारी देण्यात यावी अशी मागणी नांदेवाली येथील सरपंच अंकुश शेळके यांनी केली आहे. बीड जिल्ह्यामधील महत्त्वाचा समजला जाणारा आष्टी पाटोदा शिरूर कासार विधानसभा



मतदारसंघ या मतदारसंघांमध्ये लोकनेते गोपीनाथरावजी मुंडे व लोकनेत्या पंकजाताई यांना मानणारा बहुसंख्य मतदार आहे. सध्या तिकीट वाटप कोणत्या प्रकारे केले जाते याच्यावर सर्वांचे लक्ष लागले आहे. परंतु माजी आमदार सुरेश धस या मतदारसंघाच्या विकासात कधीही कमी पडले नसून येणाऱ्या काळात सुद्धा * मतदारसंघांमधील मतदारांच्या कामाबाबतीत व विकासाबाबतीत कधीही कमी पडणार नाहीत अशी चर्चा सर्व मतदारसंघांमध्ये आहे म्हणून सर्वसामान्यांचा माजी.आ. सुरेश धस यांच्याकडे बघितले जाते. सुरेश धस हे लोकनेते गोपीनाथरावजी मुंडे यांच्या सोबत व पंकजाताई मुंडे यांच्या सोबत एकनिष्ठेने काम केलेले असून त्यांच्या बाबतीत मतदार संघामध्ये चांगली प्रतिमा आहे त्यामुळे येणाऱ्या विधानसभा निवडणुकीमध्ये सर्वमतदार बंधूंचा निर्धार असेल आपण सुरेश धस यांना प्रचंड बहुमताने विजय करावा असे आवाहन सरपंच अंकुश शेळके यांनी केले आहे.

## स्थानिक गुन्हे शाखा-बीड कामगिरी

**प्रतिनिधी ।** बीड

बीड प्रतिनिधी - स्थानिक गुन्हे शाखा बीड ने प्रतिबंधीत पान मसाला गुटका बाळगणाऱ्या विरुध्द दोन ठिकाणी छापेमारी करुन जप्त केला १९१२६०/- गुटख्याचा मुद्देमाल मा.श्री.अविनाश बारगळ साहेब, पोलीस अधीक्षक, बीड यांनी अवैध गुटख्या विरुध्द कारवाई करण्यासाठी पोलीस निरीक्षक श्री.उस्मान शेख, स्था.गु.शा.बीड यांना आदेश दिले आहे. त्याअनुषंगाने पोलीस निरीक्षक श्री. उस्मान शेख स्था.गु.शा.बीड यांना आपले अधिपत्याखालील अधिकारी व अंमलदार यांना प्रतिबंधीत पानमसाला गुटक्या बाळणारे इसमाची माहिती काढुन कारवाई करण्याचे आदेश दिले. दिनांक २२/१०/२०२४ रोजी पोउपनि सिध्देश्वर मुरकुटे यांचे पथकाने शिवाजीनगर,बीड हद्दीतील गुप्त बातमीदारा मार्फत मिळालेल्या माहिती नुसार शिंदेनगर कॅनॉल रोड येथे इसम नामे प्रितम निवृत्ती मोहळकर, रा.शिंदे नगर यांचे हा प्रतिबंधीत गुटख्याचा मुद्देमाल एकुण ५७५००/- रु चा मुद्देमाल हस्तगत करुन पो.स्टे.शिवाजीनगर बीड येथे पोह/मनोज वाघ यांचे फिर्याद वरुन गुन्हा नोंद केला आहे. तसेच ग्रेट पोउपनि हनुमान खेडकर यांचे पथकाने बीड शहरातील हत्तीखाना येथील फशी किराणा दुकानात अवैधरित्या गुटखा बाळगुन ठेवण्याची माहिती मिळताच स्थागुशा पथकाने सदर किरणा दुकानावर छापा टाकुन प्रतिबंधीत पानमसाला गुटख्याचा १,३३७६०/- रु चा मुद्देमाल साठा करुन ठेवलेला मिळुन आला असुन आरोपी मोमीन फासीयोद्दीन मोमीन फाजलोद्दीन रा. हत्तीखाना बीड यांचे विरुध्द पो.स्टे.बीड शहर येथे गुन्हा नोंद करण्यात आला आहे. स्थानिक गुन्हे शाखा,बीड ने दोन ठिकाणी अवैध गुटखा बाळगणारे आरोपी विरुध्द छापेमारी करुन कारवाई केलेली असुन एकुण १९१२६०/- रु चा मुद्देमाल जप्त करण्यात आलेला आहे.



सदरची कामगिरी ही मा.श्री. अविनाश बारगळ, पोलीस अधिक्षक, श्री. सचिन पांडकर, अपर पोलीस अधीक्षक,बीड, पोलीस निरिक्षक श्री.उस्मान शेख, स्थानिक गुन्हे शाखा यांचे मार्गदर्शनाखाली पोउपनि सिध्देश्वर मुरकुटे, श्रेणी पोउपनि खेडकर, सफौ/तुळशिराम जगताप, पोह/५६८ ठोंबरे, मनोज वाघ, पोह/ देविदास जमदाडे, राहुल शिंदे, विकास वाघमारे, राजु पठाण, महेश जोगदंड, तुषार गायकवाड, बप्पासाहेब घोडके, चालक गणेश मराडे, सुनिल राठोड यांनी केली आहे.

# गेवराईत अमरसिंह पंडित यांच्या उपस्थितीत अजित दादांच्या राष्ट्रवादीत कार्यकर्त्यांची जोरदार इनकमिंग..!

## विजयसिंह पंडित यांना आमदार करण्याचा केला निर्धार!

**प्रतिनिधी ।** गेवराई

गेवराई : विधानसभा मतदार संघामध्ये विद्यमान नेतृत्वाला कंटाळलेल्या भाजप-सेनेच्या असंख्य कार्यकर्त्यांनी माजी आमदार अमरसिंह पंडित यांच्या उपस्थितीत राष्ट्रवादी काँग्रेस पक्षामध्ये प्रवेश करून होणाऱ्या विधानसभा निवडणुकीत विजयसिंह पंडित यांना आमदार करण्याचा निर्धार केला आहे. यावेळी अमरसिंह पंडित यांनी सर्व कार्यकर्त्यांचे राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीमध्ये स्वागत करून प्रचारासाठी सज्ज राहण्याचे आवाहन केले. यावेळी जिल्हा परिषदेचे माजी अध्यक्ष विजयसिंह पंडित, सभापती मुजीब पठाण, रा.कॉ. अध्यक्ष भाऊसाहेब नाटकर, भवानी बँकेचे उपाध्यक्ष हन्नानसेठ, अरुण चाळक, धनंजय बेद्रे, किशोर कांडेकर, सरपंच शितल साखरे, दादासाहेब चौधरी, नगरसेवक राधेशाम येवले, युवा नेते पृथ्वीराज पंडित, रणविर पंडित यांच्यासह शेख खाजाभाई, प्रभाकर पिसाळ, संजय मस्के, उत्तमराव सोलाने, दादासाहेब घोडके, अवेज शरीफ, बंटी सौंदरमल, सुभाषराव मस्के, चंद्रकांत पंडित, अशोक पंडित, बप्पासाहेब पंडित, बंडु मोटे, श्रीहरी पवार, जिल्हा बँकेचे माजी संचालक जालिंदर पिसाळ, संतोष आंधळे, सरवर पठाण, सुदाम चव्हाण, मदन लगड, रणजित सराटे, माजी सरपंच सोमेश्वर गचांडे, धमपाल भोले, विजय सुतार, राहुल बांगर, रजनी सुतार, शेख मन्सुर, कमलाकर हातागळे आदीसह राष्ट्रवादीचे पदाधिकारी, कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. यावेळी बोलताना अमरसिंह पंडित यांनी उपस्थित कार्यकर्त्यांना विजयसिंह पंडित यांच्या विजयासाठी मतदारांपर्यंत आपण केलेल्या कामांची माहिती पुरवा असे आवाहन केले. गेवराई विधानसभा मतदार संघामध्ये राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष अजितदादा गटामध्ये जोरात इनकमिंग सुरु असून माजी आमदार अमरसिंह पंडित यांच्या मार्गदर्शनाखाली आणि



विजयसिंह पंडित यांच्या नेतृत्वाखाली काम करण्याचा निर्धार करून राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये प्रवेश करत आहेत. चर्मकार महासंघाचे राज्य उपाध्यक्ष रविंद्र बोराडे, माजी सरपंच रघुनाथ राठोड, चर्मकार महासंघाचे तालुकाध्यक्ष प्रभाकर भालशंकर, चर्मकार महासंघ युवा तालुकाध्यक्ष लहुराज लोखंडे, राजेंद्र भालशंकर आदींसह माऊली पाटेकर, सुनिल पाटेकर, मनोहर जगताप, महेश जगताप, लक्ष्मण बोराडे, चंद्रशेखर बोराडे, अमर बोराडे, तन्मय बोराडे, ऋषिकेश बोराडे, अनिकेत बोराडे, सुखदेव गोरे, पांडुरंग बोराडे, राजेंद्र बोराडे, पवन बोराडे, अभिषेक पाटेकर, अक्षय बोराडे, दिपक बोराडे, कमलेश बोराडे, राजेंद्र राऊत तसेच आदींनी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षामध्ये जाहिर प्रवेश केला. गोळेगांव तांडा येथील गुलाब चव्हाण, रमेश चव्हाण, नवनाथ चव्हाण, विजय चव्हाण, विष्णू चव्हाण, अमोल चव्हाण, ज्ञानदेव चव्हाण, गणेश चव्हाण, गोरख चव्हाण, बालु चव्हाण, सचिन राठोड, युवराज चव्हाण, लखन चव्हाण, रोहिदास राठोड, शामराव राठोड, अंकुश चव्हाण, बाबु चव्हाण आदींनी तसेच नागझरी येथील कर्णा भुसारे, मदन भुसारे, राजेंद्र भुसारे, बळीराम भुसारे, विष्णूपंत जोगदंड आदींनी व कवडगांव येथील मंगेश घुगे, चांगदेव सानप, जोतिराम खरात, शौकत शेख, कृष्णा सानप, बालाजी घुगे, माऊली सानप, बाबुराव भिसे, बाळासाहेब साबळे आदींनी अमरसिंह पंडित यांच्या उपस्थितीत राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीमध्ये जाहिर प्रवेश केला.

हरलाल नाईक तांडा येथील रघुनाथ राठोड, प्रकाश राठोड, शिवाजी राठोड, विकास राठोड, राजेश पवार, कुणाल राठोड, हिरामन राठोड, बाळासाहेब राठोड, एकनाथ राठोड, जीवन राठोड, माऊली राठोड तसेच रोकडा येथील अविनाश राठोड, आण्णासाहेब राठोड, विकास काळे, सुनिता साबळे ग्रा.पं.स., निवृत्ती राठोड, अनिल राठोड, गणेश राठोड, विकास चव्हाण, मलसिंग राठोड, रोशन चव्हाण, ज्ञानेश्वर चव्हाण, विनायक जाधव, बाळु साबळे आणि रामुनाईक तांडा येथील गोरख राठोड, गोटीराम राठोड, नवनाथ राठोड, मच्छिंद्र राठोड, अनिल राठोड, मोतिराम राठोड, शंकर राठोड यांनी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षामध्ये जाहिर प्रवेश केला.

# पालकमंत्री धनंजय मुंडे उद्या २४ ऑक्टोंबर रोजी भरणार साध्या पद्धतीने उमेदवारी अर्ज

**प्रतिनिधी ।** परळी

राज्याचे कृषिमंत्री. धनंजय मुंडे हे विधान सभा सर्वत्रिक निवडणुकीसाठी परळीतून राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या वतीने महायुतीचे उमेदवार म्हणून आपला उमेदवारी अर्ज गुरुवार उद्या २४ ऑक्टोबर रोजी ठीक सकाळी ११ ते तीन या वेळेत साध्या पद्धतीने उमेदवारी अर्ज सादर करताना भाजप नेत्या आमदार. पंकजाताई मुंडे यांच्यासह परळी विधानसभा मतदारसंघातील राष्ट्रवादी काँग्रेस भारतीय जनता पक्ष शिवसेना व कटक पक्ष महायुतीचे प्रमुख पदाधिकारी यांची उपस्थिती मध्ये भरणार आहेत तरी त्यांच्यासोबत उपस्थित राहणार आहेत. दरम्यान नेहमी रेकॉर्ड ब्रेक गर्दी व विक्रमी सभांचे आयोजन करणारे . धनंजय मुंडे हे यावेळी साध्या पद्धतीने आपले उमेदवारी अर्ज दाखल करणार असून कोणतेही शक्तिप्रदर्शन व रॅली नसून किंवा सभेचे आयोजन करण्यात येणार असल्याचे त्यांच्या कार्यालयाच्या वतीने सांगण्यात आले आहे. २० १९ च्या





निवडणुकीत निवडून आल्यानंतर. धनंजय मुंडे यांनी मागील पाच वर्षाच्या काळात सामाजिक न्याय व कृषी मंत्री या दोन्ही मंत्री खात्याचे पदही बारी बारी ने सांभाळले या काळात परळी मतदारसंह बीड जिल्ह्याच्या विकासासाठी भरीव निधी उपलब्ध केला आहे. भरीव कामे करून. धनंजय मुंडे यांनी पायाभूत सुविधा च्या निर्मितीवर भर दिला बीड जिल्ह्याचे पालकमंत्री. यांनी कोविड महामारीच्या काळात. धनंजय मुंडे. यांनी परळी सह बीड जिल्ह्यात सक्षम नियोजन अत्यंत प्रभावी ठरले त्यांची दखल आंतरराष्ट्रीय माध्यमाने सुद्धा घेतली.

परळी मतदारसंघात या काळात धनंजय मुंडे च्या माध्यमातून अनेक विकास कामे पूर्ण प्रगतीपथावर आहेत त्याचा फायदा या निवडणुकीत. धनंजय मुंडे. यांना निश्चित होईल असे संकेत दिसून येत आहेत .यामध्ये विशेष उल्लेख करण्यात येत आहेत. सिरसाळा येथे बौद्ध विहार व कंपाऊंड या कामासाठी भरीव निधी दिला आहे .सामाजिक न्याय मंत्री असताना त्यांनी मंजूर केलेले हे बौद्ध विहार पूर्ण झालेला आहे.

## पक्षाचे पद घेऊन घरात बसणाऱ्या शुभम डाके याने ३ वर्षात काय दिवे लावले युवासेना जिल्हा युवाधिकारी अभिषेक दिवे

**प्रतिनिधी ।** बीड

युवा सेनेचा युवा जिल्हाधिकारी म्हणून ३ वर्ष शुभम डाके कडे पद असताना पदाला शोभेल असे एकही काम केले नाही.म्हणून शुभम डाके याला एक वर्षापूर्वीच युवा सेनेच्या पदावरून काढून टाकले आहे. काल बीड जिल्ह्यातील युवा सेनेच्या पदाधिकारी निवडी जाहीर झालेल्या आहेत. सदर निवडी सन्माननीय पक्षप्रमुख उद्धवजी ठाकरे साहेब व युवासेना प्रमुख आदित्य साहेब ठाकरे यांच्या आदेशाने झालेल्या असून सदर निवडीस हा निष्क्रिय हाप्तेखोर,जुगारी, दारुड्या,मटका,गुटका,रेती असे अवैध धंदे करणारा शुभम डाके पत्रकबाजी करत आहे. पक्षाच्या विरोधात बोलत आहे हा जर शिवसैनिक असता तर असे वागला नसता अशा निष्क्रिय शुभम डाकेची युवासेना/शिवसेनेतून तात्काळ हकालपट्टी करण्यात यावी अशी मागणी युवासेना/शिवसेना पदाधिकाऱ्यांनी केली आहे. शिवसेना जिल्हाप्रमुख परमेश्वर सातपुते यांच्या बद्दल बोलणाऱ्या या शुभम डाकेची लायकी आहे का.असा संतप्त सवाल युवासेना व शिवसेना पदाधिकाऱ्यांनी केला आहे. परमेश्वर सातपुते जिल्हाप्रमुख झाल्यानंतर आष्टी मतदार संघ व माजलगाव मतदार संघामध्ये शिवसेनेची मोठी ताकद उभा राहिलेले आहे व परमेश्वर सातपुते हे अहोरात्र पक्षासाठी मेहनत करत आहेत ते जिल्हाप्रमुख झाल्यापासून काम न करणाऱ्या व पक्षाला फसवणाऱ्या लोकांचे धाबे दणाणले आहे. त्यामुळे शुभम डाके सारख्या व्यक्तीची जिल्हाप्रमुख परमेश्वर सातपुते व पक्षाच्या विरोधात बोलण्याची लायकी नाही.ज्या शुभम




डाकेने युवासेना पदाचा दुरुपयोग करून मटका,गुटखा, रेती अशी अवैध धंदे करून व फोन बंद करून घरात दिवसभर झोप काढणाऱ्यांनी आकलेचे तारे उघडण्याची गरज नाही,तरी शुभम डाके याने पक्षविरोधी कारवाया केल्याने त्याला तात्काळ पक्षातून हकालपट्टी करावी अशी मागणी केली आहे.

# तलवाडा ग्रामपंचायत अंतर्गत ग्रामसेवकांच ऑनलाइन घोटाळा उघडकीस



## रहिवासी, जन्म दाखला, मृत्यू दाखला, असे अनेक ऑनलाईन कामाचा पैसाच भरणा केला नाही.
## शासनाला पैसा न भरता स्वत:च्या खिसा भरला
## दोन महिन्यापासून ग्रामसेवक महोदय माहिती देण्यास टाळाटाळ
## आरपीआयच्या वतीने आंदोलनाचा इशारा

**प्रतिनिधी** | तलवाडा

गेवराई तालुक्यातील तलवाडा ग्रामपंचायत पैसे कमवण्याचे क्षेत्र झाले असून जो तो अधिकारी कुठलं ना कुठल्या घोटाळ्यात तक्रार गावातील नागरिक करत आहेत अशीच पाटील ग्राम विकास अधिकारी शासनाच्या लाखो रुपयाला चुना लावला असून ऑनलाईन कामाचे आलेला पैसा एक रुपयाही न भरता स्वत:च्या खिसे भरले असल्याचे उघडकीस येत असून वारंवार संपर्क करून ही माहिती देण्यास टाळाटाळ करत असून एकमेकाचे नावे पुढे करत आहेत तरी याकडे नूतन गट विकास अधिकारी काय कारवाई करतात याकडे सर्वांचे लक्ष लागले असून कारवाई न झाल्यास आरपीआयच्या वतीने ग्रामसेवक निलंबित करण्या साठी जिल्हाधिकारी यांच्याकडे तक्रार करणे असल्याचे बोलले जात आहेयाबाबत सविस्तर माहिती अशी की, गेवराई तालुक्यातील तलवाडा ग्रामपंचायत अंतर्गत अनेक तक्रारी गावातील ग्रामस्थांनी केलेल्या असून त्यात अनेक घोटाळे चौकशी करण्यासाठी उपोषणे आंदोलने करण्यात आलेले आहे तलवाडा ग्रामपंचायत ही सोने का अंडा देने वाली मुर्गी असे कोणत्याही अधिकाऱ्याला वाटत असून टक्केवारी प्रमाण होत असल्याचे बोलले जात असून याची चर्चा चांगलीच रंगत असून याचाच फायदा घेत ग्राम विकास अधिकारी पाटील काही महिन्यापासून तलवाडा ग्रामपंचायतला रुजू झालेले आहेत पैसे कसे कमवायचे याची शकल लढवून चक्क ऑनलाईन कामात रहिवासी प्रमाणपत्र, मृत्यू प्रमाणपत्र, विवाह प्रमाणपत्र, असे अनेक प्रमाणपत्र शासनाच्या नियमाप्रमाणे त्याची फीस आकारून घेतले जातात गावातील प्रत्येक नागरिकांना कुठल्या ना कुठल्या कामासाठी अशा प्रमाणपत्राची गरज असते हे प्रमाणपत्र घेतले शिवाय कुठलीच कामे होत नाही असे शेकडो प्रमाणपत्र तलवाडा ग्रामपंचायत कडून जात असून रोज हजारो रुपये तलवाडा ग्रामपंचायतला उत्पन्न मिळते मात्र हा पैसा शासनाला जमा करावा लागत असतो या पैशाची ग्रामविकास अधिकारी पाटील आल्यापासून एक रुपयाचाही शासनास पैसा जमा केला नसून हा पैसा स्वतः ग्राम विकास अधिकारी स्वत:च्या खिशात घातला असून शासनाच्या लाखो रुपयांना चुना लावण्याचे काम होत असताना दिसून येत आहे तसेच ग्रामविकास अधिकाऱ्याचे असे अनेक काम टक्केवारीने उघडकीस येणार असून याकडे गट विकास अधिकारी काय निर्णय घेतात याकडे सर्वांचे लक्ष लागले असून ग्राम विकास अधिकारी यांच्यावर निलंबनाची कारवाई न झाल्यास आरपीआयच्या वतीने उपोषणाचा इशारा देण्यात येणार आहे

# बीडची जागा शिवसेनेचीच, मुख्यमंत्री शिंदे साहेब बाळासाहेबांच्या एकनिष्ठ शिवसैनिकावर अन्याय करणार नाहीत- सुनिल अनभुले

**प्रतिनिधी** | बीड

शिवसेनेचा बालेकिल्ला म्हणून बीडची ओळख सर्वश्रुत आहे. एकदा नव्हे तब्बल तीन वेळा शिवसेनेचा आमदार बीडकरांनी निवडणुन दिला आहे. वर्षानुवर्षे बीड मतदार संघाची जागा शिवसेनेला सुटत आली आहे आणि ती यावेळेसही शिवसेनेलाच सुटणार आहे. तीन दशकांपेक्षा अधिक काळ मा. अनिलदादा जगताप हे बाळासाहेबांच्या विचारधारनेला प्रेरित होऊन संपूर्ण जिल्ह्याभरात शिवसेना पक्ष बांधणी करत आले आहेत. बीडला शिवसेनेचा बालेकिल्ला बनविण्यात अनिलदादांचे योगदान मोलाचे आहे आणि हे बीडकर देखील चांगलेच जाणून आहेत. आजवर शिवसेना आणि बाळासाहेब यांच्या विचार व धोरनावर ठाम राहणाऱ्या अनिलदादा जगताप यांच्या कार्याचे आणि योगदानाची सर्वोपरी माहिती तळागाळातील माणसांची जाण असणारे महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री तथा शिवसेना मुख्य नेते मा. एकनाथजी शिंदे साहेब यांना आहे. यामुळे मुख्यमंत्री शिंदे साहेब हे बाळासाहेबांचे निष्ठावंत शिवसैनिक असणाऱ्या मा. अनिलदादा जगताप यांच्यावर अन्याय होऊ न देता अनिलदादांना न्याय देणार असा आम्हा शिवसैनिकांना पूर्णतः विश्वास असल्याचे बीड विधानसभा प्रमुख सुनिल अनभुले यांनी माध्यमांना पत्रक प्रसिद्ध करून आपले मत व्यक्त केले आहे. मुख्यमंत्री शिंदे साहेबांनी बीडची जागा शिवसेनेलाच सुटणार आहे व त्यासाठी कामाला लागा असे सांगितले देखील आहे आणि आम्ही देखील सर्व शिवसैनिक अनिलदादा जगताप यांना



विक्रमी मतांनी निवडून आणण्यासाठी कामाला लागलो आहोत. अनिलदादा जगताप यांचा यंदाच्या विधानसभा निवडणुकीत विजय पक्का आहे व ते विक्रमी मतांनी निवडून येणार यात तिळमात्र शंका नाही असे बीड विधानसभा प्रमुख सुनिल अनभुले यांनी पत्रकात म्हंटले आहे.

# परळी: मी चक्रव्यूहात सापडेल तो अभिमन्यू नाही, मी धनंजय आहे आणि माझ्या पाठीशी माझी जनता माझ्या पाठीशी आहे – धनंजय मुंडे

## छत्रपती संभाजीनगर मधील परळीकरांशी धनंजय मुंडे यांनी साधला मनमोकळा संवाद
## मोठ्या शहरात राहणाऱ्या माझ्या लोकांची मदत करू शकतो, हे माझे भाग्य – धनंजय मुंडे

**प्रतिनिधी** | बीड

मागील वर्षभरापासून अनेक मोठे लोक माझ्या मागे लागले असून माझे राजकीय अस्तित्व संपवण्यासाठी अभिमन्यू प्रमाणे मला चक्रव्यूहामध्ये गाठण्याचा प्रयत्न करत आहेत, मात्र अर्जुनाचेच दुसरे नाव असलेला मी धनंजय आहे; मी चक्रव्यूहात सापडणार नाही, माझ्या पाठीशी माझ्या जनतेचा आशीर्वाद आहे. जोपर्यंत माझ्या जनतेचा आशीर्वाद आणि प्रेम माझ्या पाठीशी आहे तोपर्यंत माझा अभिमन्यू कोणीही करू शकत नाही असे उद्गार आज कृषिमंत्री धनंजय मुंडे यांनी बोलताना काढले आहेत.

परळी विधानसभा मतदारसंघात सह बीड जिल्ह्यातील विविध भागातील



शिक्षण, नोकरी, व्यवसाय आदी कामानिमित्त छत्रपती संभाजी नगर व परिसरात राहणाऱ्या नागरिकांशी व विद्यार्थ्यांशी आज धनंजय मुंडे यांनी छत्रपती संभाजी नगर शहरातील लेमन ट्री हॉटेलमध्ये आयोजित कौटुंबिक स्नेह मेळाव्याच्या निमित्ताने संवाद साधला त्यावेळी ते बोलत होते.

मोठ्या शहरात विविध कामानिमित्त राहणारे विद्यार्थी व नागरिक आणि अडचणीच्या व संकटाच्या काळी मला हक्काने फोन करतात. त्यांच्या मदतीला मी तत्परतेने धावून जाण्याचा प्रयत्न करतो. परंतु अडीअडचणीच्या व संकटाच्या काळी आपल्याला मदत करेल म्हणून धनंजय वर तुमचा जो विश्वास आहे, ते माझे भाग्य आहे आणि तो विश्वास मी कायम टिकवून ठेवीन असेही पुढे बोलताना धनंजय मुंडे म्हणाले.छत्रपती संभाजीनगर शहरामध्ये परळी विधानसभा मतदारसंघासह बीड जिल्ह्यातील व मराठवाड्याच्या इतर भागातीलही असंख्य विद्यार्थी व नागरिकांनी मोठ्या उत्साहात या कौटुंबिक स्नेह मेळाव्याला प्रचंड मोठ्या संख्येने हजेरी लावलेली पाहायला मिळाली.

पुढील काही दिवसात विधानसभेची निवडणूक आहे, मी आज जो काही आहे तो तुमच्या प्रेम आशीर्वाद व मतदानाच्या जीवावर आहे. ज्याला तुम्ही उभे केले त्याचे अस्तित्व नष्ट करण्याचा अधिकार देखील तुम्हाला आहे, तो अधिकार तुम्ही इतर कुणालाही हिरावून घेऊ देणार नाहीत हा मला ठाम विश्वास आहे असेही यावेळी धनंजय मुंडे म्हणाले.

या कार्यक्रमास राष्ट्रवादी काँग्रेस सामाजिक न्याय विभागाचे प्रदेशाध्यक्ष सुनील मगरे, राष्ट्रवादी काँग्रेसचे शहर जिल्हाध्यक्ष अभिजीत देशमुख, राष्ट्रवादी काँग्रेस व्ही जे एन टी विभागाचे प्रदेशाध्यक्ष रविकांत राठोड, अजय मुंडे, कन्नडचे नगराध्यक्ष संतोष कोल्हे, केंद्रे साहेब, प्राचार्य श्रीनिवास दराडे, सुरेश वानखेडे, संयोजक दत्ता भांगे, ज्ञानेश्वर ढाकणे, राजू सानप, वैजयंतीताई मिसाळ यांसह आदी उपस्थित होते यांसह अनेक मान्यवर उपस्थित होते.

# युवाशक्ती गेवराई मध्ये परिवर्तन करेल - विजयसिंह पंडित

## विजयसिंह पंडित यांच्या उपस्थितीत युवासंवाद मेळाव्याला उत्स्फूर्त प्रतिसाद
## युवाशक्तीची लाट विजयराजेंना विधानसभेपर्यंत पोहचवण्यासाठी निर्णायक भूमिका बजावणार

**प्रतिनिधी** | गेवराई

गेवराई : विधानसभा मतदारसंघातून आज पर्यंतचे एकमेव अधिकृत उमेदवार विजयसिंह पंडित यांचा प्रचार विजयपथावर आगेकूच करत आहे. मंगळवारी गढी येथे झालेल्या एका प्रचार सभेत जमलेल्या युवाशक्तीने जणू काही येणाऱ्या विजयपर्वाची साक्ष दिली. या मतदारसंघातील युवकांना भविष्यात शिक्षण आणि नोकरीसाठी कुठलीही चिंता करावी लागणार नाही असे काम आमदार झाल्यानंतर करणार असल्याचे विजयसिंह पंडित यांनी सांगितले. गेवराई मतदार संघात अद्याप कोणत्याही उमेदवाराला पक्षाकडून हिरवा कंदील मिळालेला नाही. फक्त विजयसिंह पंडित हे राष्ट्रवादी काँग्रेसचे उमेदवार म्हणून आपले घड्याळ चिन्ह घराघरात पोहोचवत आहेत. तसा त्यांचा प्रचार मागील पाच वर्षे सलग चालू आहे. अल्पमताने झालेल्या पराभवाच्या दुसऱ्या दिवशी हा वाघ पुन्हा एकदा जनसेवेसाठी तत्पर झाला होता. लोकसभा निवडणुकीत राजेंनी पंकजाताई मुंडे यांचा प्रमाणिकपणे प्रचार केला. त्यामुळे ही जागा भाजपची हक्काची असताना त्यांनी ती राष्ट्रवादीला सोडल्यात जमा आहे. उमेदवारीची खात्री नसल्यामुळेच भाजप आमदारांना निवृत्ती जाहीर करावी लागली होती. विजयसिंह



पंडित यांनी लोकसभा निवडणुकीनंतर सुद्धा थोडी ही विश्रांती न घेता विधानसभेची तयारी सुरू केली होती. त्यामुळे मतदारसंघातील सर्वाधिक जनसंपर्क असलेला उमेदवार म्हणून त्यांच्याकडे पहिली जाऊ लागले आहे. यावर्षी गेवराई मतदार संघातील युवकांचा ट्रेंड स्पष्ट दिसत असून सर्व जात धर्म आणि पक्षांचे युवा मतदार विजय राजेंच्या व्यक्तिमत्त्वावर प्रभावित झालेले आहेत. मंगळवार दि.२२ रोजी गढी येथील देवीच्या मंदिर परिसरात युवकांचा भव्य मेळावा आयोजित करण्यात आला होता. या मेळाव्याला उपस्थिती युवकांची संख्या पाहता विजय पर्व, युवा सर्व, असे स्पष्ट जाणवत होते राजेंनी सुद्धा आपल्या उत्साहवर्धक आणि आक्रमक भाषणांमध्ये युवकांची मने प्रफुल्लीत केली. प्रत्येक युवकाला माझा उमेदवार आहे अशी जाणीव त्यांनी करून दिली. युवाशक्तीची ही लाट विजयसिंह पंडित यांना विधानसभेपर्यंत पोहोचण्यासाठी निर्णय भूमिका बजावणार आहे.



शरदचंद्र पवार साहेबांचे विचार अल्पसंख्याक समाजामध्ये रुजवन्यासाठी महाराष्ट्र प्रदेश अध्यक्ष मा.जयंत पाटील साहेब यांच्या आदेशाने व सुप्रियाताई सुळे व पक्ष निरीक्षक मा.जिवन गोरे व खासदार मा.बजरंग सोनवने व मा.दिलीप गोरे यांच्या शिफारसी नुसार अल्पसंख्याक प्रदेशाध्यक्ष मा.जावेद हबीब साहेब मा.पठाण फेरोज खान यांची राष्ट्रवादी कांग्रेस पार्टी (शरद पवार गट) अल्पसंख्याक महाराष्ट्र प्रदेश उपाध्यक्ष पदी निवड करण्यात आली.

# माजलगाव मतदार संघात डॉ जितेंद्र ओव्हाळ यांची भूमिका निर्णायक ठरणार

## दोन दिवसात भूमिका घेणार –डॉ ओव्हाळ

**प्रतिनिधी** | किल्ले धारूर

माजलगाव मतदार संघात धारूरच्या वाटयाला काय असा सवाल उपस्थित करत तालुक्यातील आंबेडकरी जनता कोणाचीही बांधील नसल्याचा दावा डॉ जितेंद्र ओव्हाळ यांनी सोमवारी धारूर येथे केला सोमवारी कार्यकर्त्याशी डॉ जितेंद्र ओव्हाळ यांनी सावंद सादला या वेळी डॉ ओव्हाळ यांचा सत्कार करण्यात आला

माजलगाव मतदार संघात आंबेडकरी विचार धारेचे हजारो लोकं आहेत आज त्याना गृहीत धरून राजकारण होत असताना आयत उमेदवार समोर आणला जात आहे आपण या बाबतीत येत्या दोन दिवसात तिन्ही तालुक्यातील आंबेडकरी जनता बरोबर घेऊन विराट मेळाव्यातून भूमिका जाहीर करणार आसल्याची माहिती डॉ जितेंद्र ओव्हाळ यांनी दिली या वेळी प्रशांत ओव्हाळ तालुका अध्यक्ष राकेश शिरसठ, बाप्पा गायकवाढ ,महेंद्र गायसमुद्रे, तुषार भालेराव ,अमोल शिरसठ, सचिन साळवे, अविनाश घायाळ, विशाल सोन्दर्मल यांच्या सह मित्र परिवार उपस्थित होता.

# वैद्यनाथनगर मधील सांडपाण्याच्या तुंबलेल्या नाल्या

## स्थानिक नागरीकांचे आरोग्य आले धैक्यात

**प्रतिनिधी** | किल्ले धारूर

**शहरातील प्रभाग क्र. १ मधील वैद्यनाथ भागातील सांडपाण्याच्या नाल्या स्वचछता केली नाही त्यामुळे त्यामध्ये कचरा अडवल्याने तुंबल्या गेलेल्या ने सांडपाणी वाहुन जाण्यास अडथळा येत आहे परिणामत:पाणी रस्त्यावरून वाहत आहेत स्थानिक नागरीक व बालकांचे आरोग्य धोक्यात आलेले आहे.या करिता तुंबलेल्या नाल्या तात्काळ मोकळ्या करून सांडपाण्याचा मार्ग सुरळीत करावा, अशी स्थानिक नागरीकची निवेदनाद्वारे करण्यात येत आहे.**

किल्ले धारूर शहरातील वैद्यनाथ नगर भागातील सांडपाण्याची विल्हेवाट लावण्यासाठी नाल्या असून त्या स्वचछता करण्यात आले नाहीत आणि त्या मध्ये सध्या पावसाळ्याचे दिवस असल्याने सांडपाणी वाहुन जाण्यास अडथळा येत आहे त्यामुळे जागेवर पाणी थांबवून डास प्रमाण वाढले आहे तसेच पाऊस पडला नतर पाणी रस्त्यावरून वाहत आहेत त्यामुळे स्थानिक नागरिकाचे आरोग्य धोक्यात आले नगर परिषद लवकरात लवकर नाल्या स्वचछता करावी अशी मागणी निखित ढगे, हनुमंत तिडक, रितेश ढगे, राजाभाऊ तिडेक, अजय बोरगावकर, भाऊसाहेब औताडे, कृष्णा फाटे, विकास तिडके, नितीन बांगर ,लक्ष्मण ढगे आदीनी निवेदनद्वारे मागणी करण्यात आली आहे.

# कृषिमंत्री धनंजय मुंडे गुरुवार दि. २४ ऑक्टोबर रोजी भरणार साध्या पद्धतीने उमेदवारी अर्ज

## आ.पंकजाताई मुंडे यांच्यासह स्थानिक पदाधिकारी राहणार उपस्थित
### कोणतेही शक्ती प्रदर्शन, रॅली किंवा सभेचे नसणार आयोजन!

**प्रतिनिधी** | परळी

राज्याचे कृषिमंत्री धनंजय मुंडे हे विधानसभा सार्वत्रिक निवडणुकीसाठी परळीतून राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या वतीने महायुतीचे उमेदवार म्हणून आपला उमेदवारी अर्ज गुरुवार, दि. २४ ऑक्टोबर रोजी सकाळी ११ ते ३ या वेळेत साध्या पद्धतीने भरणार आहेत. उमेदवारी अर्ज सादर करताना भाजप नेत्या आमदार पंकजाताई मुंडे यांच्यासह परळी विधानसभा मतदारसंघातील राष्ट्रवादी काँग्रेस, भारतीय जनता पक्ष, शिवसेना व घटकपक्ष महायुतीचे प्रमुख पदाधिकारी यांची उपस्थिती असणार आहे.

दरम्यान नेहमी रेकॉर्डब्रेक गर्दी व विक्रमी सभांचे आयोजन करणारे धनंजय मुंडे हे यावेळी साध्या पद्धतीने आपला उमेदवारी अर्ज दाखल करणार असून कोणतेही शक्ती प्रदर्शन रॅली किंवा सभेचे आयोजन करण्यात येणार नसल्याचे त्यांच्या कार्यालयाच्या वतीने सांगण्यात आले आहे.२०१९ च्या निवडणुकीमध्ये निवडून आल्यानंतर धनंजय मुंडे यांनी मागील पाच वर्षाच्या काळात सामाजिक न्याय व कृषी या दोन खात्यांचे बारी बारीने मंत्री पद सांभाळले. या काळात परळी विधानसभा मतदारसंघासह बीड जिल्ह्याच्या विकासासाठी अनेक भरीव कामे करत धनंजय मुंडे यांनी पायाभूत सुविधांच्या निर्मितीवर भर दिला. जिल्ह्याचे पालकमंत्री म्हणून कोविड महामारीच्या काळात धनंजय मुंडे यांनी परळीसह जिल्ह्यात केलेले सूक्ष्म नियोजन अत्यंत प्रभावी ठरले, त्याची दखल अगदी आंतरराष्ट्रीय माध्यमांनी सुद्धा घेतली. परळी मतदारसंघात देखील या काळात मुंडेंच्या माध्यमातून अनेक विकासकामे पूर्ण करण्यात आली, तर अनेक कामे प्रगतीपथावर आहेत, त्याचा फायदा या निवडणुकीत धनंजय मुंडे यांना निश्चितच होईल.

# नाशवंत देह एक दिवस जाणार आसल्याने आनंदी रहा-चांगलं कर्म करा

अंबाजोगाई (प्रतिनिधी)

नाशवंत देह एक दिवस जाणार आहे, त्यामुळे आनंदी रहा. चांगलं कर्म करा चांगलं कर्म केलं तर चांगले परिणाम मिळतील, वाईट कर्म केलं तर वाईट भोग माणसाला भोगावा लागेल असे उदगार संत मुकुंदरराज देवस्थानचे मठाधिपती ह भ प किसन महाराज पवार यांनी काढले नवरात्र उत्सवा निमित्य येथील श्री क्षेत्र रेणुका देवी व श्री मूळ जोगाई देवस्थान या ठिकाणी आयोजित अखंड हरिनाम सप्ताहाच्या सांगता समारंभातील काल्याच्या किर्तनसेवा प्रसंगी ह भ प किसन महाराज पवार भाविकांना उपदेश देत होते. श्री संत तुकाराम महाराज यांच्या गाथे मधील पाहती गवळणी, तव पालथी दुधानी ! म्हणे नंदाचिये पोरे ! आजी चोरी केली खरी !! त्याविन हे नासी ! नव्हे दुसरिया ऐसी !! सर्व तुका मेळा ! त्याने अगुणा आणिला या अभंगा वर आधारित कीर्तना मधून भाविकांना उपदेश देताना ह भ प किसन महाराज पवार महाराज म्हणाले की, श्री रेणुका देवी संस्थान मध्ये १५ दिवसाचा उत्सव पार पाडने सोपे नाही. इथे १५ दिवस अन्नदान होते हे या ठिकाणच वैशिष्ट्य आहे. मुकुंदराज संस्थानची परंपरा शहरात अनेक ठिकाणी चालू आहे त्या पैकी रेणुका देवी देवस्थान एक आहे.

गोपाळ कृष्ण निर्घृण निराकार होते, सगुण साकार होते. माणसाचा नाशवंत देह एक दिवस जाणार आहे, त्यामुळे आनंदी रहा. चांगलं कर्म करा चांगलं कर्म केलं चांगले परिणाम मिळतील भोग, वाईट कर्म केलं तर वाईट भोग माणसाला भोगावा लागेल.

संत महात्मे कधी जन्माला यायचे किती दिवस रहायचे त्यांच्या हातात कधी जायचं त्यांच्या हातात आहे. तुमच आमचं जीवन मात्र कर्मावर अवलंबुन आहे. मुला साठी कितीही कमावल तर आई बापाला म्हणतात आमच्या साठी काय केलं? त्या साठी पैसा कमी कमवा मात्र चारित्र्य संपन्न पिढी घडवण्याची आज काळाची गरज आहे. नवरात्र उत्सवा निमित्य श्री रेणुकादेवी व श्री मुळजोगाई देवस्थान, अंबाजोगाई येथे कै. मुकुंदअप्पा यादव कै. शामलाल मोदी, कै.



शिवाजीराव अंबेकर, कै. बी. एन. सातपुते, कै. ताराचंद परदेशी यांच्या प्रेरणेने व वै. माधवबुवा शास्त्री, किसन महाराज पवार यांच्या आशिर्वादाने नवरात्रौत्सवा निमित्य श्री योगेश परदेशी, देवस्थानचे मुख्य व्यवस्थापक व पुजारी श्री. दत्तात्रय अंबेकर व उत्सवाचे चालक नानाश्री यादव, मनोज जाधव, प्रमोद पाटील, टिंकू परदेशी, राज कुडके, परमेश्वर दोनगहु, ओम दोनगहू, रजनीकांत हुलगुंडे, राहुल मोदी, शिवानंद हरंगूळे, यांच्या सह असंख्य भाविकांच्या उपस्थिती मध्ये घटस्थापना झाल्या नंतर श्री विष्णुशेठ बजाज यांच्या हस्ते गाथा पुजनाने महोत्सवा निमित्त आयोजित अखंड हरिनाम सप्ताहास प्रारंभ झाला. या उत्सवात श्री.ह.भ.प. बाळासाहेब महाराज कुलकर्णी, श्री.ह.भ.प. विकास महाराज गडदे, श्री.ह.भ.प. गुरुवर्य अच्युत महाराज जोशी, ह भ प अमोल महाराज गोरे सोनपेठकर, ह.भ.प. डॉ. पांडुरंग महाराज तिडके, श्री.ह.भ.प. डॉ. नाथराव महाराज गरजाळे, श्री.ह.भ.प. शिवाजी महाराज ठोंबरे, श्री.ह.भ.प. गोविंद महाराज सुकरे की ना वारकरी संस्था, अंबाजोगाई), ह भ प पांडुरंग महाराज कोकाट नांदगाव, ह भ प प्रमोद महाराज आव्हाड, श्री.ह.भ.प.गजानन महाराज सुवर्णकार घाटनांदूर, श्री. ह. भ. प. श्रीकृष्ण महाराज चवार, श्री. ह. भ. प. प्रभाकर महाराज उगले यांनी कीर्तन सेवा दिल्या नंतर ह भ प किसन महाराज पवार यांच्या काल्याच्या किर्तनाने सप्ताहाची व आराधी मेळ्याने उत्सवाची सांगता झाली.

उत्सव काळात अशोक मोदी यांच्या हस्ते होम-हवन होवून श्री रेणुका देवी पालखीची गावभर परिक्रमा झाली यावेळी जागोजागी भक्तांनी पालखीचे स्वागत केले. संपूर्ण उत्सव काळात संत सावता महाराज भजनी मंडळ अंबाजोगाईचे प्रमुख अमोल महाराज घोडके व त्यांचे सहकारी पद्माकर महाराज महामुनी, संजय अंकुलवार, ज्ञानोबा डोंगरे, दिलीप आपेगावकर, बालासाहेब महाराज कुलकर्णी, अशोक महाराज क्षीरसागर, धनेगावकर, हरणे महाराज, हरिदास बामणे महाराज, किशोर महाराज ईरलापल्ले, बिरुदेव सोन्नर, बालासाहेब विखे पाटील, मदन महाराज जाधव, शिवाजी पांचाळ, कचरे महाराज निवृत्ती विणेकरी, दशरथ महाराज कदम वादक अभिषेक महाराज तांदळे, शुभम तिवारी, महारुद्र नरवणे, दत्ता गायकवाड, दिगंबर महाराज घाटनांदुरकर, दत्ता माले, बबन आपेट यांनी १५ दिवस कीर्तन सेवेत आपला सहभाग नोंदवून कार्यक्रमाची शोभा वाढवली.

## आ.नमितातांई मुंदडा यांच्या उमेदवारीचे चिंचोलीमाळी सर्कल मधे उत्साहात स्वागत

केज/प्रतिनिधी

भारतीय जनता पक्षाने केज विधानसभा मतदार संघातून आ.नमितातांई मुंदडा यांना पहिल्या यादीत उमेदवारी जाहीर केल्या बद्दल आ.नमिता ताई मुंदडा यांचे भाजपचे ज्येष्ठ नेते सुनिल आबा गलांडे पाटील केज पंचायत समितीचे मा. सभापती विष्णू भाऊ घुले,जेष्ठ नेते रामकृष्ण घुले काका,चेअरमन अरुण तात्या काळे, उप सरपंच धिरजराव वनवे, व्हाईस चेअरमन आबासाहेब केदार,डोका चे सरपंच गोरख भांगे, हादगाव चे उपसरपंच श्रीराम वायबसे,लिंबराज अण्णा फरके,टाकळी चे माजी सरपंच रघुनाथ बारगजे,आरणगाव चे सरपंच सचिन सिरसट, चेअरमन आश्रुबा भांगे, हनुमंत पिंप्रीचे सरपंच सचिन चंदनशिव,डोणगाव चे सरपंच बळीराम भगत, जाधवजवळा चे सरपंच वैभव भारती,डॉ.अमोल जाधव,राजाभाऊ उगले, गणेश जाधव,सुनील शिंदे, विकास



जाधव,डोणगाव चे माजी सरपंच बाबूराव घुले,दगडु दळवे,दिलीप गायकवाड,रविंद्र गलांडे, मनोज गालफाडे,विठ्ठल झाडे,राजाभाऊ नखाते, चंद्रकांत भुजबळ,नितीन काळे,सुहास शिंदे,गणेश काळे,बालाजी काळे, यशवंत काळे,मेजर हनुमंतराव वायबसे,गणेश वायबसे,भागवत वायबसे, बी.जी.गदळे,वैभव केंद्रे, अनंत कराड,महादेव गिते, चत्रभूज वनवे,व्यंकट बारगजे,मुकादम गोरख बारगजे,मुकादम रघुनाथ बारगजे,जीवन बारगजे, सुरज घुले,राम घुले, प्रकाश बारगजे,विक्रम घुले,भागवत घुले,चंद्रकांत घुले,टि.पी.घुले,मुकुंदघुले, मल्हारी बारगजे,धनाजी इंगोले,बाळासाहेब कांदे, तानाजी फरके,अशोक घाटूळ,प्रकाश देशपांडे, दत्ता करडे,समाधानचादर, माणिक आप्पा फरके, रामचंद्र भाऊ जाधव, बाजीराव काटे,पांडुरंग ईंगळे,राजाभाऊ तिडके, महाजन,चत्रभूज गिते, कुंडलीक सालपे,जीवन रामिष्ठ,भारत घाडगे, चव्हाण,बालासाहेब जाधव,विलास जाधव, विकास शिंदे,दिगंबर गव्हाणे,अशोक निंगुळे, संतोषबोराडे,आप्पासाहेब देशमुख,भगवानराव देशमुख

## वंचित बहुजन आघाडीचा धारुर तालुका आयोजित कार्यकर्ता मेळावा संपन्न

केज ।प्रतिनिधी

वंचित बहुजन आघाडी माजलगाव मतदार संघाचे अधिकृत उमेदवार शेख मंजुर यांच्या उपस्थितीत कार्यकर्ता मेळावा धारूर शहरातील आर्या फंक्शन हॉल येथे संपन्न झाला. दलित,मुस्लिम,आदिवासीओबीसी समूहामध्ये शेख मंजुर यांच्या उमेदवारीने अतिशय उत्साहाचे वातावरण तालुक्यामध्ये निर्माण झालेले आहेत.या बैठकीचे प्रास्ताविकरानबा उजगरे यांनी केले.वंचित बहुजन आघाडीचे तालुकाध्यक्ष इंजि.प्रशांत उघडे यांनी बोलताना सांगितले कि,पक्षाने दिलेला उमेदवार शेख मंजुर असुन तो सर्व बाळासाहेब आंबेडकर यांच्या कार्यकर्त्यांना मंजुर आहे.येणार्या विधानसभा निवडणुकीत मोठ्या ताकदीने शेख मंजुरयांच्या पाठीमागे उभे राहण्याचे आश्वासन दिले.वंचित बहुजन आघाडीचे उमेदवार शेख मंजुर यांनी




माजलगाव मध्ये नगर परिषदेचे नगराध्यक्ष असताना विविध कल्याण कारी योजना राबवून केलेल्या विकास कामांची माहिती दिली.येणाऱ्या विधानसभेच्या अनुषंगाने माजलगाव मतदार संघा तील धारूर तालुक्यातील घाट रुंदीकरणाचा प्रश्न असेल धारूर शहरातील पाणीपुरवठ्याची योजना असेल प्रभावी राबवण्याचे धारूरकरांना आणि धारुर तालुक्यातील जनतेला आश्वासन दिले.येणाऱ्या काळामध्ये धारूर तालुक्यातील उद्योग धंद्यांचा प्रश्न असेल, सुशिक्षित बेरोजगारांचा प्रश्न असेल विद्यार्थ्यांचा प्रश्न असेल अशा अनेक प्रश्नांना घेऊन आपण जर मला संधी दिली तर नक्कीच याची पूर्तता करण्याचे आश्वासन शेख मंजूर भाई यांनी बोलताना दिले.या बैठकीला वंचित बहुजन आघाडीचे जिल्हा उपाध्यक्ष भारत तांगडे, सचिन उजगरे,वंचित बहुजन आघाडीचे माजी जिल्हाध्यक्ष अनिल भैय्या डोंगरे,युवक जिल्हाध्यक्ष बाबुराव मस्के,माजलगाव तालुका अध्यक्ष संजय नाकलगावकर,वडवणी तालुकाध्यक्ष अविनाश झोडगे,समाधान गायकवाड,धम्मानंद साळवे धारूर तालुक्याचे महासचिव अभिजीत वाव्हळ,अमोल बनसोडे, बाळासाहेब उजगरे, शहराध्यक्ष आकाश गायसमुद्रे तसेच धारूर तालुक्यातील कार्यकत

## भारताने जगाला सर्वश्रेष्ठ विज्ञानाची देणगी दिली-स्वामी गोविंददेव गिरीजी महाराज

### सेलूतील श्रीराम कथेच्या मोठा प्रतिसाद

सेलू : प्रतिनिधी

रामायण, महाभारत ही महाकाव्य त्याकाळी आपली वैज्ञानिक प्रगती कशी होती. हे दाखवणारे ग्रंथ आहेत. शुन्याचा शोध लावून जागाला पुर्णत्व देणाऱ्या भारताने जगाला सर्वश्रेष्ठ विज्ञानाची देणगी दिली. गुणाकार कसा करायचा, वर्गमूळ, घनमुळ कसे काढायचे हे वर्णन'रूद्ररूसा'या ग्रंथात मिळेल. त्यामुळेच आजच्या पिढीला भारतीय प्राचीन वैज्ञानिक प्रगती शिकवण्याची आवश्यकता आहे. असे प्रतिपादन अयोध्या येथील श्रीराम जन्मभूमी तीर्थक्षेत्र न्यासाचे कोषाध्यक्ष, राष्ट्रसंत स्वामी गोविंददेव गिरीजी महाराज यांनी केले. शहरातील नूतन विद्यालयाच्या मैदानावर



उभारण्यात आलेल्या हनुमानगढ परिसरात अयोध्या नगरीत सोमवार ( दि. २१ ) रोजी राष्ट्रसंत गोविंददेव गिरीजी महाराज यांच्या ओजस्वी अमृत वाणीतून सुरू असलेल्या रामकथेचे सातवे पुष्प भक्तीमय, भारावलेल्या वातावरणात संपन्न झाले. रामकथेच्या सातव्या दिवशी बारा ज्योतिर्लिंगाचा देखणा मंच उभारण्यात आला होता. पुढे स्वामीजी म्हणाले की, छत्रपती शिवाजी महाराज हे आपले दैवत आहेत. प्रत्येकाच्या अंतःकरणातील शिवाजी महाराज जागले पाहिजेत. छत्रपती शिवाजी महाराजांनी लोकशाही मूल्ये आपल्याला दिली आहेत. ती समतेची शिकवण आपण अनुसरायला हवी. आपण कपडे स्वच्छ आणि असे परिधान करावेत की, आपल्यापेक्षा लहानांना आपला आदर वाटेल. संस्कृती ही आपल्या कपड्यात, वर्तनात, भाषेत दिसते. आपले आरोग्य चांगले राहण्यासाठी हॉटेलमध्ये जेवण करण्यापेक्षा घरी भोजन करावे. महाराष्ट्र पध्दतीचे भोजन जगात सर्वोत्कृष्ट आहे. असेही ते म्हणाले. कथा श्रवणासाठी महिला -पुरूषांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.सुत्रसंचलन प्रा. संजय पिंपळगावकर यांनी केले.

## हरी तुझ्या मुरलीने मन मोहिले माझे श्रीराधा कृष्णजी महाराज यांच्या भजन संध्याने श्रीराम कथेच्या दुधात साखर पडली-स्वामी गोविंददेवगिरीजी महाराज बनले श्रोते

सेलू, प्रतिनिधी

मोहिले माझे मन, हरी तुझ्या मुरलीने मन मोहिले माझे, यासह अनेक भक्तिमय भजन सादर करून, गोवत्स श्रीराधाकृष्णजी महाराज यांनी उपस्थितांची मने जिंकली. विशेष म्हणजे अयोध्या येथील श्रीराम जन्मभूमी न्यासचे कोषाध्यक्ष स्वामी गोविंददेवगिरीजी महाराज यांनी श्रोत्यात बसून संपूर्ण भजनसंध्या चा रस श्रवण केला .श्रीराम कथेचे आयोजक जयप्रकाश बिहाणी यांनी , कार्यक्रमाचे प्रास्ताविक केले.

भजो भजो पांडुरंग, विठ्ठला, याभजनाने भजनसंध्या ची सुरुवात झाली .तर पांडुरंग विठ्ठला, पंढरीनाथा विठ्ठला, विठ्ठल विठ्ठल विठ्ठला ,कधी येशील माझ्या घरा ,जब राम मेरे घर आयेंगे ,माझे सद्गुरु अंगणी आले ,ऐक गोविंदा विनवू किर्तीदा ,थंडगार पाणी, वाजते थंडी, वस्त्र दे रे गोविंदा ,दास रघुनाथ का सखा श्रीनाथ का ,कुछ इधर की रहा ,कुछ ऊधर की रहा,विठ्ठल माझा माझा मी विठ्ठलाचा ,असे अनेक भक्तिमय भजन सादर करून



भाविकांनी ओसंडून गेलेल्या मंडपात, भाविकांचा आनंद देखील ओसंडून वाहताना दिसला. प्रत्येक भजनाच्या तालावर तरुणाई उभे राहून नृत्य करू लागली. यावेळी त्यांच्या चेहऱ्यावरील आनंद देखील ओसंडून वाहताना दिसत होता .

भाग्यशाली सेलूकर

महाराज स्वामी गोविंददेवगिरीजी महाराज यांची इथे श्रीरामकथा सुरू आहे. महाराजांचे संपूर्ण सेलू नगरीवर प्रेम आहे. हे खूप मोलाचे आहे .कारण संपूर्ण संसाराची उपलब्ध एकीकडे ,आणि एका संताचे प्रेम एकीकडे असते. संतांची सोबत प्रत्यक्षात भगवंतांची अनुभूती देते. म्हणून सेलू नगरीतील एखादा व्यक्ती मुख्यमंत्री झाल्यानंतर जो आनंद सेलूकारांना मिळेल, त्याहीपेक्षा अधिक आनंद संतांची कृपा झाल्यानंतर मिळतो. ही सेलूकरांसाठी खूप मोठी गोष्ट आहे .म्हणून सेलूकर मंडळी भाग्यशाली असल्याचे प्रतिपादन ,गोवत्स श्रीराधाकृष्णजी महाराज यांनी केले आहे.

गोवत्स बालकांची संघटना उभी केली .

आपल्या देशाचे भाग्य आहे की, संतांच्या पंक्तीत बसून संता सारखे जीवन जगून दाखवून, केवळ गोमातेची सेवा करणे हेच ध्येय ठेवणारे श्रीराधाकृष्णजी महाराज यांनी गोवत्स बालकांची संघटना उभी केली आहे .त्यामुळे हे अतिशय मोलाचे व मोठे काम ते करत आहेत. आज भजनसंध्या ची अनुभूती घेताना आपल्या सोबत नक्की कुठेतरी उभे राहून प्रत्यक्ष भगवान देखील या भजन संस्थेचा रस ग्रहण करीत असतील ,कारण भक्त बसून गातात तेव्हा भगवान उभे राहून ते ऐकतात ,आणि जेव्हा भक्त उभे राहून गातात तेव्हा भगवान नृत्य करतात. त्यामुळे नक्कीच आजच्या इतक्या सुंदर भजनाचा रस भगवंतांनी देखील ग्रहन केले असेल

## इम्तियाज जलील भाजपची बी टीम, भाजप, शिवसेनेकडून पैसे खातात

### गफ्फार कादरींचा आरोप, एमआयएम पक्षात मोठी फूट

विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर एमआयएम पक्षात मोठी फूट पडली आहे. एमआयएमचे प्रदेश कार्याध्यक्ष गफ्फार कादरी यांनी इम्तियाज जलील यांच्यावर गंभीर आरोप करत अखेर आपल्या पदाचा राजीनामा दिला आहे. इम्तियाज जलील हे भाजपची बी टीम असून ते फडणवीस सांगेल तसा पक्षाचा वापर करतात असे कादरी म्हणाले.

इम्तियाज जलील हे भाजप, शिवसेनेकडून मोठ्या प्रमाणात पैसे खातात असा आरोपही कादरी यांनी केला आहे. तसेच जलील यांच्यात हिंमत असेल तर त्यांनी नांदेड नाही तर फडणवीस यांच्या विरोधात नागपूरमधून निवडणूक लढवून दाखवावं असं आव्हान देखील कादरी यांनी दिलं. शिवाय हिंमत असेल तर माझ्या विरोधात लढा असं आव्हानही त्यांनी दिलं आहे.

भाजपच्या उमेदवाराला मदत करण्याचा प्रयत्न

गेल्या काही दिवसापूर्वी कादरी यांनी आपल्या कार्यकर्त्यांची बैठक बोलावली होती. यामध्ये आपल्याला पक्षात डावलले जात असून, इम्तियाज जलील यांच्याकडून आपली उमेदवारी कापून भाजपच्या उमेदवाराला मदत करण्याचा प्रयत्न केला जात असल्याचा आरोप केला होता. यापुढे पक्षात राहायचं की नाही याबाबत निर्णय घेण्यासाठी कादरी यांनी कार्यकर्त्यांची बैठक बोलावली होती. यावेळी त्यांनी इम्तियाज जलील यांच्यावर गंभीर आरोप केले होते. गफ्फार कादरी यांनी त्यांच्या समर्थकांची बैठक बोलावली होती.असदुद्दीन ओवैसी आणि अकबर ओवैसी यांच्याकडे तक्रार करून देखील आपल्याला न्याय मिळत नाही नसल्याचे कादरी यांनी म्हटलं आहे. कार्यकर्त्यांच्या बैठकीत त्यांचं म्हणणे ऐकून लवकरच आपण निर्णय घेणार असल्याचं कादरी म्हणाले होते. अखेर आज त्यांनी निर्णय गेतला आहे. एमआयएमच्या प्रदेश कार्याध्यक्षपदाचा त्यांनी राजीनामा दिला आहे. त्यामुळं आता एमआयएम पक्षात मोठी फूट पडली आहे.

कोण आहेत गफ्फार कादरी?

गफ्फार कादरी एमआयएम पक्षातील महत्वाचे नेते आहेत. एमआयएममध्ये गफ्फार कादरी महाराष्ट्र कार्यकारी अध्यक्ष पदावर कार्यरत आहेत. औरंगाबाद पूर्व या विधानसभा मतदारसंघातून ते निवडणूक लढवण्यासाठी इच्छुक आहेत. यापूर्वी त्यांनी दोनवेळा निवडणूक लढवली होती. गफ्फार कादरी यांचा २०१४ मध्ये चार हजार मतांनी पराभव झाला होता. तर, २०१९ मध्ये १४ हजार मतांनी पराभव झाला होता. भाजप मंत्री अतुल सावे यांच्या विरोधात त्यांना दोनवेळा पराभव स्वीकारावा लागला होता. यावेळी ते पुन्हा निवडणूक लढवण्यासाठी इच्छुक आहेत.

## महिलांनी बिन टाक्याच्या कुटुंबकल्याण शस्त्रक्रियेचा लाभ घ्या-डॉ.अशिक शेख

मानवत / प्रतिनिधी

मानवत ग्रामीण रुग्णालया मध्ये शुक्रवार दिनांक २५ ऑक्टोबर वार शुक्रवारी २०२४ रोजी कुटुंब कल्याण शस्त्रक्रिया (बिना टाक्याची) करण्यासाठी शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. तरी मानवत शहरासह तालुक्यातील महिलांनी यासाठी एक दिवस अगोदर नाव नोंदणी करून बिन टाक्याच्या कुटुंबकल्याण शस्त्रक्रियेचा लाभ घ्यावा असे आवाहन मानवत ग्रामीण रुग्णालयाचे वैद्यकीय अधीक्षक डॉ. अशीक हुसेन शेख यांनी केले आहे. कुटुंब कल्याण शस्त्रक्रिया या दोन प्रकारच्या केल्या जातात त्यामध्ये एक टाक्याची आणि दुसरी बिन टाक्यांची शस्त्रक्रिया केली जाते. याचं अनुषंगाने २५ ऑक्टोबर रोजी ग्रामीण रुग्णालय मानवत, येथे शिबीर आयोजित केले आहे आलेले रुग्णांवर शस्त्रक्रिया करण्यासाठी शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे,

या शिबिरासाठी रुग्णालयातील अधीपरीचका शीला पाटील, परिचारिका सर्व आरोग्य सेवक अकबर खान पठाण, अधिपरिसेविका रत्नमाला दाभाडे, रेणुका गिराम, व सारिका आखाडे, या कर्मचाऱ्यांकडे नाव नोंदणी करून शिबिराचा लाभ घ्यावा असे आवाहन मानवत ग्रामीण रुग्णालयाच्या वतीने वैद्यकीय अधीक्षक डॉ. शेख आशिक यांनी केले आहे.

- बिना टाक्याच्या शस्त्रक्रियेचे फायदा.




बिन टाक्याच्या कुटुंब कल्याण शस्त्रक्रिया करत असताना रुग्णाला कोणताही त्रास होत नाही. तसेच रुग्णाला रुग्णालयामध्ये सात दिवस ऍडमिट राहण्याची गरज नाही. ज्या दिवशी शस्त्रक्रिया झाली त्याच्या दुसऱ्या दिवशी रुग्णाला रुग्णालयातून डिस्चार्ज दिला जातो. यामुळे बिन टाक्याच्या शस्त्रक्रियेचा रुग्णांना जास्त प्रमाणात फायदा होतो. त्यामूळे नागरिकांनी मोठ्या प्रमाणात या शिबीराचा लाभ घ्यावा असे आवाहन मानवत ग्रामिण रूग्णालयाचे वैद्यकिय अधिक्षक आशिक शेख यांनी केले आहे.

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक दीपक इंदर थोरात यांनी निर्मिती प्रिंटस्, धोंडीपुरा, टिळक रोड, जोशी नर्सिंग होमसमोर, बीड ता.जि.बीड-४३११२२ येथे छापुन कार्यालय सायं.दैनिक महाराष्ट्र आरंभ, घर नं.१-७-३८१,जुन्या पोलीस अधीक्षक कार्यालयाजवळ, थोरातवाडी बीड-४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक - दीपक इंदर थोरात

THIS NEWSPAPERS IS PRINTED BY OWNER , PRINTER, PUBLISHER DEEPAK INDAR THORAT AT THE NIRMITI PRINTS,TILAK ROAD , DHONDIPURA, IN FRONT OF JOSHI NURSING HOME, BEED, TQ.BEED DIST.BEED-431122 (MH) AND PUBLISHED AT. THE OFFICE OF DAILY EVENING MAHARASHTRA AARAMBH , H.NO.1-7-381, NEAR OLD S.P. OFFICE,THORATWADI, BEED TQ.DIST.BEED -431122 EDITOR - DIPAK INDAR THORAT